Newspaper: Maharashtra Times

Article date: 24 July 2017

Events description article

# गणिताशी करा दोस्ती

**प्रथमेश ठाणेकर/दुहिता लिमये,** कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com

गणित म्हटलं की आपल्यापैकी अनेकांच्या मनात धडकीच भरते. गणित हा विषयच बऱ्याच जणांना आवडत नाही. पण गणित विषय म्हणून एकदा का नीट एकदा समजलं की त्याच्यासारखी दुसरी गंमत नाही. म्हणूनच हा विषय साध्या-सोप्या पद्धतीनं मांडण्याचा प्रयत्न करणार आहेत माटुंग्याच्या पोदार कॉलेजचे विद्यार्थी. कॉलेजच्या मॅथ्स असोसिएशननं दरवर्षीप्रमाणे यंदाही 'मॅथेमॅट्रिक्स - अ बेटर वे टू लर्न मॅथ्स' या फेस्टिव्हलचं आयोजन केलंय. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टचा मीडिया पार्टनर आहे. २८ आणि २९ जुलै या दोन दिवसांत हा फेस्ट पार पडणार असून, यात गणितावर आधारित वेगवेगळ्या प्रकारचे इव्हेंट्स होणार आहेत.

**पोदार कॉलेजमध्ये रंगणार 'मॅथेमट्रिक्स'**

हा फेस्टिव्हल शाळा तसंच कॉलेजांमधल्या विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. गणित आवडणाऱ्यांसाठी या फेस्टिव्हलमध्ये खूप काही आहेच. पण काहींच्या मनात असलेली गणिताची भीती घालवण्याचं कामही हा फेस्टिव्हल करणार आहे.

या फेस्टद्वारे पुस्तकांबरोबरच आणखीही वेगवेगळ्या प्रकारे गणिताबद्दल आवड निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न असतो. विद्यार्थीच विद्यार्थ्यांसाठी हे आयोजित करण्यासाठी एकत्र येतात हे या फेस्टचं वैशिष्ट्य आहे, असं 'मॅथेमॅट्रिक्स'चे टीचर-इन-चार्ज असिफ शेख यांनी सांगितलं. 'मॅथेमॅट्रिक्स'मध्ये सहभागी होण्यासाठी आणि फेस्टविषयी इतर माहितीसाठी कॉलेजशी संपर्क साधावा. संपर्क : ९८२०७९५८०४.



## काही विशेष इव्हेंट्स

**न्यूमरो आर्ट** - गणितीय चिन्ह आणि संज्ञा वापरून चित्र बनवण्याची स्पर्धा (फक्त शालेय विद्यार्थ्यांसाठी)

**मॅथ्स अँड वॉर** - युद्धशास्त्रात गणिताचा होणारा वापर याबाबत माहिती देणारं व्याख्यान.

**4D व मूव्ह विथ मॅथ्स** यासारख्या प्रश्नमंजुषा आणि हसतखेळत गणित शिकण्यासाठी 'दी मॅथेमॅजिशयन' शो.

**बॅटल ऑफ बीड्स** - IPL प्रमाणे खेळाडूंवर बोली लावण्याची व त्यांना विकत घेण्याची संधी.

**डकवर्थ-लुईस मेथड,** पायथागोरस प्रमेय आणि विविध मॉडेल्स यातून विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने गणित समजून घेता येईल.

*याचबरोबर अनेक सेमिनार्स, प्रदर्शन आणि स्पर्धा याद्वारे सहभागी होण्याची संधी .*